पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State जिल्हा मुंबई District पोलीस ठाणे खापरवि Police Station, पहिली खबर क्र. 34 FIR No. वर्ष 2026 Year दिनांक 17/11/26 Date

2. (i) अधिनियम Act भटाचार प्रतिबंध आधि. 1988 कलमे Sections 07
   (ii) अधिनियम Act ..... कलमे Sections .....
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day सोमवार तारीख पासून Date from 16/11/26 वेळ Time 12.00 तारीख पर्यंत Date to 16/11/26 वेळ Time 18.55 वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

   (1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ✓ ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
   (6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 16/11/2026 वेळ Time 17.00 वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference ; Entry No. 01/26 तारीख Date 17/11/2026 वेळ Time 05.05 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 1 KM पश्चिम चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No.
   Place of Occurrence ; (a) Direction and distance from P. S.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव महाराष्ट्र Address of Occurrence Name ठिकाणाचे नंबर No. if any शून्य कामगार गल्ली Ward विभा योजना रस्त्याचे नाव Name of road कामगार,

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place कामगार हॉस्पिटल गाव Village पोस्ट Post बिल्डिंग, तालुका Taluka पहीना जिल्हा Dist. छेडा, राज्य State वरली मुंबई

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..... तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State .....

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री. विठ्ठल पिसाळ (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री जगन्नाथ पिसाळ

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 37 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 70213247 - 92,

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..... दिल्याचा दिनांक Date of issue ..... दिल्याचे ठिकाण Place of Issue ..... (f) व्यवसाय Occupation नोकरी

   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..... जनजात Sub-Caste .....

   (h) पत्ता Address ...ल्या मजुर पालघी/सर्वे नं. प्रतिबंध Ward घर/गाव नं. House Name No. विभाग फोन/मो. नं. Phone No. वरली पॅन नं. Pan No. मुंबई वोटर्स नं. Card No. .....

   रस्त्याचे नाव Road ..... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..... गाव Village ..... पोस्ट Post ..... पो. स्टे. P. Stn. .....

   तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State ..... सध्याचा पत्ता Present Address .....

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. खु. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   जितेंद्र जसवंत आमलकर, वय 30 वर्षे, पद - लेखा अधिकारी, नेमणूक - महाराष्ट्र राज्य कामगार विभा योजना, वरली, मुंबई

 राहि - B/203, ओम शिवगंगा CHS, सेंट्रल पार्क जवळ, विरार (प.), पालघर.

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री विठ्ठल जगन्नाथ पिसाळ, वय ३१ वर्षे, यांचा स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्यातील फिर्याद म्हणून संबोधण्यात यावा.

समक्ष

(श्री. प्रदीप आलगेकर)
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि. मुंबई

(श्री. विठ्ठल पिसाळ)
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक १७/११/२०२६

मी, विठ्ठल जगन्नाथ पिसाळ, वय ३७ वर्षे, व्यवसाय – नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणूक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ७०२१३२४७९२

मी वरील प्रमाणे असून, दिनांक ०६/०८/२०२६ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी सोमवार, दिनांक १६/११/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचा पडताळणी क्रमांक ८०/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता सापळा अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून सहायक पोलीस आयुक्त, प्रविण नावडकर यांची नेमणूक केल्याबाबत आदेश मिळाला. नमुद पडताळणीमधील तक्रारदार श्री शेखर भास्कर पाटील यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार यांची वहिनी नामे अनुराधा प्रविण पाटील यांची वैदयकीय उपकरण पुरवठा करणारी, मे. वेदांगी फार्मासिटीकल नावाची प्रोपायटरी फर्म आहे. सदर फर्ममध्ये तक्रारदार काम करत असुन, वेगवेगळया शासकीय कार्यालयात कपंनीचे असलेले काम तक्रारदार पाहतात. त्यांची कंपनी ही वेगवेगळया शासकीय हॉस्पीटल येथे वैदयकीय उपकरण पुरवठयाचे काम करते.

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, वरळी, मुंबई या कार्यालयाने त्यांच्या अंतर्गत सेवा रुग्णालयासाठी वैदयकीय उपकरण पुरवठा करण्याच्या कामाचा तक्रारदार काम करीत असलेल्या कपंनीस दिनांक ०४/०२/२०२६ रोजी रुपये १३.७९ कोटी व दिनांक १३/१०/२०२६ रोजी रुपये २.४९ कोटी असे एकुण रु. १६.२८ कोटी रुपयांचा कार्यादेश दिला आहे. त्याप्रमाणे तक्रारदार काम करीत कंपनीने त्या त्या कार्यादेशाप्रमाणे लगेच वैदयकीय उपकरणाचा पुरवठा केला आहे. सदर वैदयकीय उपकरणाचा पुरवठा केल्यानंतर कंपनीने दिंनांक २३/०२/२०२६ रोजी रुपये १३.७९ कोटीचे बील व दिनांक २९/१०/२०२६ रोजी रुपये २.४९ कोटीचे बील मंजुरीसाठी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, वरळी, मुंबई या कार्यालयात जमा केले होते. सदर बील मंजुरीचे काम हे सदर कार्यालयातील लेखा अधिकारी श्री. जितेंद्र जयहिंद साखरकर यांच्याकडे प्रलंबित होते. सदर बील मंजुरीच्या पाठपुरवा करण्यासाठी तक्रारदार अधुनमधुन श्री साखरकर साहेब यांना भेटण्यास जात असे. श्री साखरकर साहेब यांनी बीलाचा पाठपुरावा करत असताना तक्रारदार यांचेकडे बील मंजुर झाल्यानंतर पैसे दयावे लागतील असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना बील मंजुर तर करा असे बोलुन नंतर पाहु असे बोलले. तक्रारदार मागील सात आठ महीन्यापासुन बीलाचा पाठपुरावा करत असताना देखील लेखाधिकारी श्री साखरकर हे बिल मंजुर करत नव्हते व भेटीच्या वेळेस तक्रारदारास बील मंजुर झाल्यानंतर पैसे दयावे लागतील असे बोलत असत.

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, वरळी, मुंबई या कार्यालयाने तक्रारदार यांचे मे. वेदांगी फार्मासिटीकल कंपनीचे रुपये १.९५ कोटीचे व रुपये ५.५८ कोटी असे एकुण अंदाजे रुपये ७.५० कोटी रक्कमेचे बिल दिनांक १६/११/२०२६ रोजी मंजुर केले असुन, लेखाधिकारी श्री साखरकर यांनी त्याच दिवशी दिनांक १६/११/२०२६ रोजी फोन करुन कार्यालयात भेटण्यास बोलावले. म्हणून तक्रारदार दुपारी १२.०० वा. चे दरम्यान त्यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदारास रुपये ७.५० कोटीचे बील मंजुर झाले असुन बील मंजुर केले म्हणुन मोबदला म्हणुन तक्रारदाराकडे रुपये ७.५० लाख रक्कमेची मागणी केली तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना नंतर येवुन भेटुन कळवितो असे सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवक श्री जितेंद्र साखरकर, पद – लेखा अधिकारी, नेमणूक – राज्य कामगार विमा योजना, मुंबई (आरोग्य विभाग) यांना रूपये ७,५०,०००/– इतक्या लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, तक्रारदार यांनी दिनांक १६/११/२०२६ रोजी लाप्रवि. मुंबई येथे समक्ष हजर राहून स्व:हस्तलिखित तक्रार दिली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री निखील

Risal

Scanned with OKEN Scanner

महादेव रोकडे, वय ३० वर्षे, पद – कनिष्ठ अभियंता, नेमणूक – कार्यकारी अभियंता पश्चिम, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा, वांद्रे (पुर्व), मुंबई २) श्री शशिकांत पंडीतराव गोस्वामी, वय ४९ वर्षे, पद – वरिष्ठ लिपीक, नेमणूक – मुख्य लेखा अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा, वांद्रे (पुर्व), मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ प्रविण नावडकर, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

मी व पर्यवेक्षक अधिकारी सपोआ नावडकर यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार हे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी दिनांक १६/११/२०२६ रोजी जाणार आहेत. तदनंतर दिनांक १६/११/२०२६ रोजी पडताळणी कारवाईसाठी तक्रारदार व दोन्ही पंच हे हजर राहील्यानंतर त्यांना मी व सपोआ नावडकर यांनी पडताळणी कारवाईच्या सुचना दिल्या व त्यानंतर, मी व दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. रावराणे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन माझी, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार श्री शेखर पाटील यांनी त्यांचे मोबाईल व्हॉट्स अप क्रमांक ९९७५२४९६४५ वरून लोकसेवक श्री जितेंद्र साखरकर, यांचे मोबाईल क्रमांक ८८२८१८२३७८ वर १७.५५ वा. फोन केला असता, लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदार यांना 'कुठे आहेस, कधी येणार' असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक श्री साखरकर यांना आलो. 'दहा, दहा, पंधरा मिनट थांबा' असे सांगून कॉल कट केला. त्यानंतर १८.०१ वा. लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदार यांना व्हॉट्सअप कॉल केला. सदरचा कॉल माझे सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी पंचासमक्ष उचलला असता, लोकसेवक श्री साखरकर यांनी **'डॉक्युमेंट्स घेवुन येताय की, असंच येताय?'** असे तक्रारदार यांना विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवकास **'नाही येतोय डॉक्युमेंट्स'** असे सांगितले असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांना **'ओके, ओके या मग'** असे सांगून कॉल कट केला.

लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदार यांना भेटण्याकरीता आताच कार्यालयात बोलाविल्याने मी, सापळा पथक व पंच असे आम्ही तात्काळ पोद्दार रूग्णालय, वरळी च्या मागील गल्लीमध्ये शासकीय वाहनाने गेलो. तेथे मी व सपोआ नावडकर यांनी तक्रारदार यांना पडताळणी कारवाई संदर्भात आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर १८.२४ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या सफेद रंगाच्या शर्टच्या आतील बाजूस असलेल्या बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावून पंच क्र. ०१ श्री निखील रोकडे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालय असलेले महाराष्ट्र राज्य कामगार विमा कार्यालय, कामगार हॉस्पिटल बिल्डींग, वरळी, मुंबई येथे पाठविले. तक्रारदार यांनी पंच क्र. ०१ श्री निखील रोकडे यांचे सोबत लोकसेवक श्री साखरकर यांची त्यांचे केबिनमध्ये प्रत्यक्ष भेट घेतली. सदर भेटी दरम्यान लोकसेवकाने तक्रारदारास **'अरे पण डॉक्युमेंट्स कुठे आणलेत ?'** असे बोलून डॉक्युमेंन्टसच्या कोडवर्ड खाली तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी **'नाय, नाय. देणार की'** असे सांगितले. पुढे तक्रारदार यांनी लोकसेवकास **'टोटल डॉक्युमेंट्स किती आहेत आपलं ?'** असे विचारले असता, लोकसेवकाने तक्रारदारास **'आत्ताच तुमच साधारणत: साडेसात, पावनेआठ समथिंग काही तरी बसतयं,**

समक्ष,

(प्रदीप आजगेकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

एक्झॅटली' असे बोलले. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवकास **'लाख'** असे विचारले असता, लोकसेवकाने तक्रारदारास **'हा'** असे बोलले असता, तक्रारदार यांनी लोकसेवकास **'हं. आता ह्यातलं जरा टोकन देतो. परत दोन दिवसांनी सगळी कॅश व्हिड्रॉल करून'** सांगितले. अशाप्रकारे लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदाराकडे डॉक्युमेंन्टसच्या कोडवर्ड खाली रूपये ७,५०,०००/– इतक्या लाचेची मागणी करून आज टोकन म्हणून शक्य होईल तेवढी रक्कम स्विकारण्याचे निश्चित केले. वर नमुद भेटी दरम्यान लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदार यांचेकडून आजच टोकन रक्कम म्हणून लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केल्याने आजच सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पंचासमक्ष पोद्दार हॉस्पिटलच्या मागील गल्लीमध्ये सापळापुर्व कारवाई पुर्ण करण्यात आली. सापळा पुर्व कारवाई दरम्यान मी तक्रारदार यांचेकडे लोकसेवकास देण्यात येणाऱ्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडे सध्या रूपये ५०,०००/– असल्याचे सांगून सदरची रक्कम माझेकडे दिली. सदर रोख रक्कमेची मी पाहणी केली असता, त्यामध्ये रूपये ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटा मिळून आल्या. माझे सूचनेप्रमाणे रूपये ५०,०००/– च्या भारतीय चलनी नोटांचा फोटो सापळा पथकातील अंमलदार यांचे मार्फतीने मोबाईलमध्ये काढला व माझे सूचनेप्रमाणे पंचासमक्ष पोलीस वाहन चालक श्री चौरे यांनी रूपये ५०,०००/– (रूपये ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटा) रक्कमेस ॲन्थ्रासिन पावडर लावली व सदरची लाचेची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये ठेवून सदर पाकीटास देखिल श्री चौरे यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे ॲन्थ्रासिन पावडर लावलेले खाकी रंगाचे पाकीट श्री चौरे यांनी तक्रारदार यांनी परीधान केलेल्या काळया रंगाच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवले. त्यांनतर मी व सपोआ नावडकर यांनी तक्रारदार, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे स्वत:च्या केसांवरून डावा हात वारंवार फिरवून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत इशारा करण्यास सांगितले.

ठरल्याप्रमाणे सापळा पथकातील काही अंमलदार हे राज्य कामगार विमा कार्यालय, कामगार हॉस्पिटल, वरळीच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. त्यानंतर मी १८.४७ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या सफेद रंगाच्या शर्टच्या आतील बाजुस लावून तक्रारदार यांना पंच क्र. ०१ श्री रोकडे यांचेसह लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यांचे मागोमाग मी, सपोआ नावडकर व पंच क्र. ०२ श्री गोस्वामी, उर्वरीत पथक देखिल पायी चालत राज्य कामगार विमा कार्यालय, कामगार हॉस्पिटलच्या परिसर तळमजला येथे आलो. तेव्हा तक्रारदार व पंच श्री रोकडे हे कामगार हॉस्पिटलमधील पहिल्या माळयावर गेले व मी आणि सपोआ नावडकर असे सापळा पथकासह राज्य कामगार विमा कार्यालय, कामगार हॉस्पिटलच्या परिसरामध्ये थांबून राहीलो.

तक्रारदार व पंच क्र. ०१ श्री रोकडे हे राज्य कामगार विमा कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील श्री जितेंद्र जयहिंद साखरकर, लेखा अधिकारी तथा सहाय्यक संचालक यांचे केबिनमध्ये गेले. लोकसेवक श्री साखरकर यांचे केबिनमध्ये तक्रारदार व पंच क्र. ०१ श्री रोकडे यांचे समक्ष प्रत्यक्ष भेट झाली. भेटी दरम्यान लोकसेवक श्री साखरकर यांनी तक्रारदार यांना **'एक तास झाला शेखर पाटील. बसा. डॉक्युमेंट, मोठे – मोठे डॉक्युमेंट आणले'** असे विचारले असता, तक्रारदार यांनी लोकसेवकास **'हे टोकन आहे सर'** असे सांगितले. तेव्हा लोकसेवकाने **'किती?'** असे विचारले असता, तक्रारदार यांनी लोकसेवकास **'पन्नास'** असे बोलून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन लाच रक्कमेचे खाकी रंगाचे

समक्ष,

(प्रदीप आजगेकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

पाकीट बाहेर काढून लोकसेवक यांचे सागोर धरले, तेव्हा लोकसेवक श्री साखरकर यांनी सदरचे लाचेच्या रक्कमेची खाकी रंगाचे पाकीट उजव्या हातांनी स्विकारून ते खुर्चीच्या मागे असलेल्या त्यांच्या काळया रंगाच्या सॅग बॅगमध्ये ठेवले, त्यानंतर काही वेळात पंच क्र. ०१ श्री रोकडे हे लोकसेवक श्री साखरकर यांचे कक्षामधुन बाहेर आले व पहिल्या मजल्यावरील सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे पुर्व नियोजीत इशारा करून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारलेली असल्याबाबत कळविले, त्यावर तात्काळ आजुबाजुस थांबलेल्या सापळा पथकातील पोलीस अंमलदार श्री जगदीश तेली व श्री मनोज परब यांनी लोकसेवक यांना १८.५५ वा. ताब्यात घेतले, ताब्यात घेतलेल्या लोकसेवकास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता – श्री जितेंद्र जयहिंद साखरकर, वय ५० वर्षे, पद – लेखा अधिकारी, नेमणूक – राज्य कामगार विमा योजना, मुंबई (आरोग्य विभाग) राठि – बी/२०३, ओम शिवगंगा कोऑहौसो. सेंन्ट्रल पार्कजवळ, विरार पश्चिम मुळ गाव – मु.पो. माडबन, तालुका – राजापूर, जिल्हा – रत्नागिरी असे सांगितले, सपोआ नावडकर यांनी लोकसेवक श्री साखरकर यांना लाचेच्या रक्कमेच्या खाकी रंगाच्या पाकीटाबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांच्या काळया रंगाच्या सॅग बॅगमध्ये ठेवलेले असल्याचे सांगितले, त्यावर पंचासमक्ष काळया रंगाच्या सॅगबॅग मधुन लाच रक्कमेचे खाकी रंगाचे पाकीट हस्तगत करून त्यामधील रक्कम बाहेर काढली, नमूदच्या रक्कमेच्या भारतीय चलनी नोटांची पाहणी केली असता, सापळा पुर्व कारवाई मध्ये मोबाईल मधील फोटो काढलेल्या रूपये ५०,०००/– च्या नोटांचे नंबर व ताब्यात घेतलेल्या लाचेची रक्कमेच्या नोटांमधील भारतीय चलनी नोटांचे नंबर हे सारखेच असल्याचे दिसून आले, तसेच हस्तगत केलेल्या खाकी रंगाच्या पाकीटाची व लाचेच्या रक्कमेची चार्जर अल्ट्राव्हायलेट व्हायलेटच्या दिव्याखाली तपासणी केली असता, नमूच्या लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रोसिन पावडर लावलेली असल्याचे दिसून त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर लोकसेवक श्री साखरकर यांचे केबिनमध्येच यशस्वी सापळा कारवाईची टिप्पनी नोद करुन उर्वरीत कार्यवाही पुर्ण करून पुढील कार्यवाहीकरीता आम्ही ताब्यात घेतलेल्या लोकसेवक श्री साखरकर यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक १६/११/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री जितेंद्र जयहिंद साखरकर, पद – लेखा अधिकारी, नेमणूक – राज्य कामगार विमा योजना, मुंबई (आरोग्य विभाग) यांनी तकारदार यांचे वेदांगी फार्मासिटीकल कंपनीचे त्यांच्या कार्यालय महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना कार्यालय, वरळी, मुंबई यास सेवा रुग्णालयांसाठी पुरवलेल्या वैदयकिय उपकरणोचे बील रक्कम रूपये ७.५० कोटी मंजूर केल्यानंतर, केलेल्या कामाचा मोबदला म्हणून बील मंजूर झाल्यानंतर रूपये ७,५०,०००/– रक्कम देण्याचे सांगून, त्यापैकी आत्ता शक्य होईल तेवढी रक्कम देण्यास सांगून लाचेची मागणी केली व त्याच दिवशी तक्रारदार यांचेकडून मागणी केलेल्या रक्कमेपैकी रूपये ५०,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(प्रदीप आजगेकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..... तात्काळ .....

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.....

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... ३०,०००/- रुपये

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .....

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी कलम ३, ७ मधील नमूद आरोपी यांनी तक्रारदार यांचे मे. वेदांती फायनेंशियल कंपनीचे यांच्या कार्यालय महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना कार्यालय, वाशी, मुंबई यास सेवा रुग्णालयांसाठी पुरविलेल्या वैद्यकीय उपकरणांचे बील रक्कम रु. ०१,५७,६७ कोड संपूर्ण केल्यानंतर केलेल्या कामाचा मोबदला म्हणून बील मंजूर झाल्यानंतर रु. ७,३० लाख रुपये रक्कम देण्याचे सांगून सोपेकी आता रक्कम होईल तेवढी रक्कम देण्याचे सांगून लाच मागणी केली व रु. ३०,०००/- लाच रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून संशय विरोधात गु. र. नं. आदी. १७६६ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ..... श्रीमती संदीप आघवाड .....

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ..... Rank ..... No. .....
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .....

(3) Transferred to P. S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ..... प्रदीप आघवाड .....
पदनाम Rank ..... पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई .....
तपासिक अ. चा कोड क्र. .....
Posting
Code No. of I. O. .....

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..... 17/11/2026 .....
1. Date and time of submitted to the Court.

प्रत Copy to	2 फिर्यादी, 2. Complainant,	3. पोलीस अधीक्षक (संगणक), 3. Supdt. of Police (Computer),	4. तपासिक अंमलदार, 4. Inv. Officer,	5. स्थळ प्रत. 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner